नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र. ३४३**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १६ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - राजेंद्रसिंह नवलसिंह इंगळे,
वय - ५७ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - भालेगाव, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझ्याकडे अडीच एकर शेती आहे. मी जगन नारखेडेच्या प्रकणात साक्ष देण्याकरिता आलो आहे. मी जगन नारखेडे याला ओळखतो. तो माझ्या गावातला आहे. माझे जावई संदीप उत्तमसिंह पाटील रा. तेलखेड याला जगन नारखेडे यास कापूस द्यायचा होता. त्यावेळेस मी पुण्याला होतो. त्यावेळी माझ्या जावयांचा फोन आला व ते मला म्हणाले की, जगन नारखेडे याला कापूस द्यायचा आहे. मी घरी आलो. त्यानंतर मी संदीप पाटील व जगन नारखेडे यांचे बोलणे करुन दिले. त्यानंतर जगन नारखेडे याने कापूस घेण्याकरिता तेलखेडला गाडी पाठवली. गाडीवाला म्हणाला की, मला गाव माहीत नाही. ती गाडी धामणगाव बडे या गावची होती. जगन नारखेडे याने विनायक गारमोडेला कापूस आणण्याकरिता गाडी पाठवली. तेथून तो कापूस मलकापुर येथील श्री जीनींग येथे आणला. तो कापूस ११४ क्वींटल भरला. त्यानंतर विनायक गारमोडेने हजार रुपये क्वींटलप्रमाणे संदीप पाटील यांना पैसे दिले. उर्वरित पैसे जगन नारखेडे कडे दिले. वीस दिवसानंतर जगन नारखेडे याने अर्धे पैसे संदीप पाटील यांना दिले. त्याच्यानंतर उर्वरित पैसे पुढील वीस दिवसानंतर देण्याचे ठरले होते. परंतु ते पैसे दिले नाही. अशाचप्रकारे तेलखेड येथील लोकांनी जगन नारखेडे याला कापूस दिला. त्यामध्ये सुभाष इंगळे, गजानन इंगळे, सुर्यभान इंगळे, बळीराम इंगळे इत्यांदीनी कापूस दिला. याशिवाय, तांदुळवाडी, नरवेल इथल्या शेतक-यांनी देखील जगन नारखेडे याला कापूस दिला. तसेच वसंता भारंबे लोणवडी, तळणीचे सोमाजी नाफडे, नरवेलचे शिवाजी पुंजाजी हिवराळे हे सर्व लोक तेलखेडच्या लोकांसोबत संपर्कात होते. याशिवाय, वरखेडचे देखील दोन लोक होते. त्यांनी सुध्दा जगन नारखेडेला कापूस दिला व ते त्याच्या घरी सुध्दा आले होते. तो कापूस तीनशेच्या वरती काही तरी क्वींटल होता. पैशाचा करार होता. परंतु त्यांना

पैसे मिळाले नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. मी जगन नारखेडे व विनायक गारमोडे यांना ओळखतो. जगन नारखेडे हा दृकश्राव्य पध्दतीने हजर असून विनायक गारमोडे हा आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ व ११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस.जगताप याचंचेमार्फत सुरु....</u>**

०२. मी सरतपासात सांगितलेल्या लोकांचे सातबारा उतारे पाहिले नव्हते. तसेच मी त्यांचे पेरेपत्रक देखील पाहिले नव्हते. त्यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीची सीसीआय मार्फत कापूस खरेदी चालू असल्याचे मला माहीत नाही. त्यावेळी सीसीआय मार्फत चालू असलेल्या कापूस खरेदीचा भाव ९ हजार ते १० हजार प्रति क्वींटल चालू असल्याचे माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर व्यवहारात माझा आरोपी क्र.१ शी वैयक्तीकरित्या संबंध आला नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी गाडी वाला म्हणाला की, मला गाव माहीत नाही, धामणगाव बडे या गावची गाडी असल्याची, तो कापूस ११४ क्वींटल भरला, ते त्यांच्या घरी सुध्दा आले होते, तसेच वरील सर्व लोक हे तेलखेड येथील लोकांच्या संपर्कात होते व म्हणून त्यांनी कापूस दिल्याचे सांगितले होते. सदर बाबी माझ्या बयाणात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. मला गाडीवाल्याचे नाव देखील सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेल्या लोकांना आरोपी क्र.१ चे देणे लागते असे खोटे सांगत आहे. मी जबाब देतेवेळी पैशाचा करार होता, पैसे मिळाले नाही असे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वर नमुद केलेल्या लोकांमध्ये काही लोक माझे नातेवाईक देखील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद केलेल्या लोकांमध्ये माझे नातेवाईक असल्यामुळे व त्यांना जास्तीत जास्त आर्थीक परतावा मिळावा म्हणून मी त्यांची नावे सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा सांगत आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. संदीप इंगळे व जगन नारखेडे यांच्यामध्ये मी दलाल म्हणून काम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर व्यवहारापोटी जगन नारखेडे हा मला प्रति क्वींटल पाचशे रुपये कमीशन म्हणून देणार होता. आता मला माझ्या जबाबातीत अधोरेखांकीत भाग वाचून

दाखविण्यात आला. तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास भाग अ देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, म्हणजेच मी जगन नारखेडेचा कमीशन एजंट म्हणून काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मला पाचशे रुपये प्रति क्वींटल प्रमाणे कमिशन मिळणार होते म्हणून मी वर सरतपासात नमुद केलेल्या लोकांचा कापूस विकला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासात सांगितलेल्या लोकांशी आरोपी शरद बोरले व राजेंद्र पाटील यांचा कोणताही संबंध आला नव्हता. शरद बोरले व राजेंद्र पाटील यांचा जगन नारखेडेशी संबंध नसल्याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५. हे म्हणणे खरे आहे की, संदीप पाटील व जगन नारखेडे यांचे बोलणे मी करुन दिले असून आमच्यात मध्यस्थी म्हणून तिसरा व्यक्ती कोणीही नव्हता. माझे जगन नारखेडे सोबत कापसाच्या भावाबाबत बोलणे झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझी संपूर्ण माहीती ही ऐकीव माहीत आहे. सरतपासात नमुद केलेल्या लोकांनी कापूस दिल्याचा माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मला गाडी नंबर सांगता येणार नाही. कापूस कोणत्या तारखेला, कोणत्या दिवशी, किती वाजता नेला व कोणी नेला हे सांगता येणार नाही. सरतपासात नमुद केलेल्या लोकांनी जगन नारखेडेला कापूस दिल्यानंतर मला कमिशन पोटी पैसे देण्याचे ठरले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यात तसे काही बोलणे देखील झाले नव्हते. आता मला माझ्या जबाबातीत अधोरेखांकित भाग वाचून दाखविण्यात आला. तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा आहे. त्यास भाग ब देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांशी हात मिळवणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमुद केलेल्या लोकांनी कापूस विकल्याबाबत मला काहीही माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व कासतागारांची मी हमी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र.१ ते ३, ११, ६, ७, ९ व १४ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र.१ ते ३, ११, ६, ७, ९ व १४ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र.१ ते ३, ११, ६, ७, ९ व १४ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र.१ ते ३, ११, ६, ७, ९ व १४ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र.१ ते ३, ११, ६, ७, ९ व १४ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.12.01 17:34:04 +0530

दिनांक : ०१/१२/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर